आर.सी.सी. क्र.२८१/२०२२
नि.क्र. २१५

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.२१ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

माझे नांव– प्रमोद तात्यासाहेब वाघ
वय – ४० वर्षे, व्यवसाय– नोकरी
सध्या ने.स.पो.नि., अडावत पो.स्टे., जि.जळगाव

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस. पटेकर यांचेमार्फत</u>–**

दि.४.२.२०२० ते मार्च २०२४ पर्यंत मी पारनेर पो.स्टे. येथे स.पो.नि. म्हणुन कार्यरत होतो. दोषारोपपत्र क्र.३१९/२०२२ दि.१०.८.२०२२ रोजी दाखल झाले असताना गुन्हयाचा उर्वरीत तपास दि.१८.११.२०२२ रोजी पो.नि. साहेबांनी माझ्याकडे बँकेकडुन फोर्जड् डॉक्युमेंटस जप्त करणेकामी व त्याचा तपास करणेकामी माझ्याकडे लेखी आदेशान्वये दिला. आता मला तो लेखी आदेश दाखवण्यात आला. त्या लेखी आदेशावर दि.१६.११.२०२२ तारीख असल्याचे नमुद आहे. मात्र तो आदेश मला दि.१८.११.२०२२ रोजी दिला असल्याने त्या तारखेवर मी गोल आळा मारला व त्या आदेशामधील मजकुर बरोबर असुन त्यावर आमचे पी.आय.साहेबांची सही आहे. त्यास **नि.२१६** देण्यात येते. माझ्याकडे तपास आल्यावर त्या वेळेसचे बँकेचे शाखाधिकारी आनंद रंगारी हे फोर्जड् डॉक्युमेंटस पो.स्टे.ला घेवुन आले व त्या अनुषंगाने मी त्यांचा सविस्तर जबाब नोंदवला व त्यांनी हजर केलेले फोर्जड् डॉक्युमेंटस जप्त करुन त्याचा जप्ती पंचनामा तयार केला. त्या पंचनाम्यावेळी आनंद रंगारी व २ सरकारी पंच घनशाम किसन औटी व अजित सुरेश कावरे हजर होते. तो पंचनामा पो.स्टे.ला केला. मी जप्त केलेल्या ४ पावत्यांमध्ये पहीली पावती गूलाबी व पिवळया रंगाची तुकाराम तिकोणे यांची ठेवपावती क्र.११२२२० खाते क्र.३७९०८७६७७८ दि.१६.१०.२०१९ रोजीची साडे तीन लाख रुपयांची होती. दुसरी ठेवपावती ही रंजना मोरे यांची होती व तिचा क्र.११२२७६ असा होता व तिचा खाते क्र.३८०५६७३४४८ असा होता व त्याची तारीख २३.३.२०२० अशी होती आणि ती पावती साडे तीन लाख रुपयांची होती. तसेच तिसरी पावती सुखदेव पवार यांची ठेवपावती क्र.११२२१२ होती व त्याचा खाते क्र.३७९०८७६७७८ असा होता व ती पावती दि.१.१२.२०१९ रोजीची होती

व ती ९ लाख २२ हजार रुपयांची होती. सदरील तिन्ही पावत्यांवर बँकेच्या अधिकृत अधिका–याची सही व सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा वडझीरे यांचा शिक्का होता. चौथी पावती ही लाल रंगाची विथड्रॉवल स्लीप होती व ती पावती सुखदेव पवार यांची होती. त्याचा खाते क्र.३१४६०५४३६८ असा होता व ती पावती दि.१.११.२०१९ रोजीची होती व ती ९ लाख २२ हजार रुपयांची होती. तो पंचनामा मी दि.१८.११.२०२२ रोजी दुपारी १२.१५ ते १३.१५ दरम्यान केला. आता मला तो पंचनामा दाखवण्यात आला असता त्यावर माझी व २ पंचांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. तो पंचनामा नि.७२ व ७३ वर आहे. आता मला जप्त केलेल्या पावत्या दाखवण्यात आल्या. तुकाराम तिकोणे यांची ठेवपावती निच३, रंजना मोरे यांची ठेवपावती नि.४७, सुखदेव पवार यांची ठेवपावती नि.५२ आणि सुखदेव पवार यांची विथड्रॉवल स्लीप नि.५१ वर दाखल असुन त्या मला दाखवण्यात आल्या असता त्या त्याच असुन त्या पावत्या मी जप्त केल्या होत्या. त्या पावत्यांची मी मुद्देमाल पावती तयार केली. आता मला ती मुद्देमाल पावती दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर असुन त्यास **नि.२१७** देण्यात येतो. त्यानंतर मी शाखाधिकारी, सेंट्रल बँक ऑफ इंडीया यांना दि.१.१२.२०२२ रोजी आरोपीचे नैसर्गिक सहयांचे नमुने देण्यासंदर्भात पत्र पाठवले होते. आता मला ते पत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी सही असुन व बँकेच्या कर्मचा–याची पोहोच मिळाल्याबाबत सही व शिक्का असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.२१८** देण्यात येते. त्यानंतर दि.२.१२.२०२२ रोजी शाखा व्यवस्थापक हे आरोपीचे नैसर्गिक सहयांचे एकुण ६ नमुने माझ्याकडे घेवुन आले व ते मी पो.स्टे.ला जप्ती पंचनामा करुन २ पंच नामे दिपक सावकार ढवण व समित दामोदर बोराडे यांच्यासमक्ष जप्त केले. आता मला एन१ ते एन६ असे नंबर असलेले ६ नमुने दाखवण्यात आले. तेच नमुने मी जप्त पंचनाम्याद्वारे जप्त केले होते. आता मला तो जपती पंचनामा दाखवण्यात आला असता त्यावर माझी, २ पंचांची व नमुने सादर करणारे शाखा प्रमुख आनंद रंगारी यांची सही आहे व त्यातील मजकुर बरोबर आहे. तो पंचनामा नि.१२२ वर आहे. त्या नमुन्यांची मी मुद्देमाल पावती तयार केली. आता मला ती मुद्देमाल पावती दाखवण्यात आली असता त्यातील मजकुर बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.२१९** देण्यात येते. त्यानंतर मी

दि.१८.१.२०२२ रोजी  सेंट्रल बॅक ऑफ इंडीया यांना प्रकाश बोरुडे, भुषण संखे आणि विद्या उघडे यांची प्रत्येकी ६ नैसर्गिक सहयांचे नमुने देण्याबाबत पत्र दिले होते. आता मला ते पत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी सही असुन व बँकेच्या कर्मचा–याची पोहोच मिळाल्याबाबत सही व शिक्का असुन  त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.२२०** देण्यात येते. त्यापुर्वी दि.१८.११.२०२२ रोजी सेंट्रल बँक ऑफ इंडीया यांना मी घटना  घडली त्यावेळी कोण कर्तव्यावर हजर होते याबाबत पत्राद्वारे माहीती मागवली असता मला प्रकाश बोरुडे, भुषण संखे व विद्या उघडे यांची नावे त्याद्वारे कळाल्यावर मी त्या तिघांचे प्रत्येकी ६ नैसर्गिक सहयांचे नमुने देण्याबाबत बँकेला पत्र दिले होते. आता मला ते पत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी सही असुन व बँकेच्या कर्मचा–याची पोहोच मिळाल्याबाबत सही व शिक्का असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.२२१** देण्यात येते. त्याचदिवशी मी बँकेला जा.क्र.५४/२०२२ अन्वये संबंधीत अधिका–यांचे सहयांचे नमुने घेण्यासंदर्भात त्यांना  पो.स्टे.ला हजर राहण्यासाठी कळवण्यासंदर्भात मी पत्र दिले होते. आता मला ते पत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी सही असुन व बँकेमधील आनंद रंगाची यांची पोहोच मिळाल्याबाबत सही व शिक्का असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.२२२** देण्यात येते.

त्यानंतर जे अधिकारी हजर झाले त्या सगळयांचे २ पंचांसमक्ष मी नैसर्गिक सहयांचे नमुने पो.स्टे.ला घेतले. त्यानंतर मी आरोपी न्यायालयीन कोठडीत असल्याने दि.२५.११.२०२२ रोजी कोर्टास आरोपीचे नैसर्गिक सहयांचे नमुने घेण्याबाबत पत्र पाठवले होते. आता मला ते पत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी व पोलीस निरीक्षक यांची सही असुन व त्यावर न्यायालयाचा आदेश असुन त्या पत्रातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.२२३** देण्यात येते. त्यानंतर मी दि.१.१२.२०२२ रोजी आरोपीचे दुपारी ४ वाजता सहयांचे नमुने घेण्यासंदर्भात जेलरने त्यावेळी समक्ष हजर रहावे याबाबत जेलरला पत्र पाठवले होते. आता मला ते पत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी व जेलरची सही असुन व त्या पत्रातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.२२४** देण्यात येते. त्यानंतर मी दुपारी ४ वाजता जेलर व २ पंचांसमक्ष आरोपीचे नैसर्गिक सहयांचे नमुने घेतले.

त्यानंतर मी नैसर्गिक सहयांचे नमुने, वादग्रस्त सहयांचे नमुने यास मार्क करुन

नंबरींग केले. आरोपीचे वादग्रस्त सहयांच्या नमुन्यास मी क्यु१ते क्यु६ मार्क केले. बॅंकेने आरोपीचे दिलेले नैसर्गिक सहयांना मी एन१ ते एन६ मार्क केले. तसेच बॅंकेने प्रकाश बोरुडे यांचे दिलेल्या नैसर्गिक सहयांच्या नमुन्यांना एन७ ते एन१२, विद्या उघडे यांच्या नैसर्गिक सहयांच्या नमुन्यांना एन१३ ते एन१८, संतोष कांबळे यांच्या नैसर्गिक सहयांच्या नमुन्यांना एन १९ ते एन२४ आणि भुषण संखे यांच्या नैसर्गिक सहयांच्या नमुन्यांना एन२५ ते एन३० मी मार्क केले. त्यानंतर मी आरोपीकडुन घेतलेल्या नैसर्गिक सहयांच्या नमुन्यांना एस१ ते एस४२ मार्क केले. तसेच मी घेतलेल्या नैसर्गिक सहयांच्या नमुन्यांमध्ये प्रकाश बोरुडे यांच्या सहयांना एस४३ ते एस८४, विद्या उघडे यांच्या सहयांना एस८५ ते एस१२६, संतोष कांबळे यांच्या सहयांना एस१२७ ते एस१६८ आणि भुषण संखे यांच्यासहयांना एस१६९ ते एस२१० असे मार्क केले. त्यानंतर मी प्रश्नावली तयार करुन मुख्य शासकीय दस्तऐवज परिक्षक, हस्त व छाया गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांना एस.पी. ऑफीस मार्फत रिपोर्ट पाठवला. त्याकरीता मी पो.कॉ.२७००/बी.बी.भापसे यांच्या ताब्यात सदरचा रिपोर्ट व पत्र दिले होते. आता मला मी तयार केलेल्या प्रश्नावलीचा रिपोर्ट दाखवण्यात आला. त्यावर माझीव पी.आय. साहेबांची सही असुन त्यास **नि.२२५** देण्यात येते. तो रिपोर्ट मी पत्राद्वारे पोलीस अधिक्षक,अहमदनगर यांच्यामार्फत पाठवला होता. त्याबाबतचे दि.३१.१.२०२३ रोजीचे पत्र मला दाखवण्यात आले. त्यावर माझी, पी.आय. साहेब यांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्या पत्रास **नि.२२६** देण्यात येते. त्यानंतर एस.पी. कार्यालयाने वेगळे पत्र तयार करुन सदरचा रिपोर्ट मुख्य शासकीय दस्तऐवज परिक्षक, हस्त व छाया गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांना पाठवला. आरोपीचे मी स्वतः घेतलेले नैसर्गिक सहयांचे नमुने व साक्षीदारांचे नैसर्गिक सहयांचे नमुने मी स्वतः घेताना पंच साक्षीदार दिपक सावकार ढवण व समित दामोदर बोराडे हजर होते. तपासाकामी मी आरोपीस पाहीले होते. तो आज न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीकरीता विधीज्ञ श्री.ए.पी. रोकडे यांच्यामार्फतः**

हे म्हणणे खरे आहे की बोत्रे व काळे साहेबांनी केलेल्या तपासाबाबत मला वैयक्तीकरित्या माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की दि.१८.११.२०२२ किंवा

१६.११.२०२२ रोजीच्या लेखी आदेशावर खाडाखोड असल्यामुळे मला तपासाबाबत तसा कोणताच लेखी आदेश मिळाला नव्हता. बोत्रे व काळे साहेबांनी साक्षीदारांचे नोंदवलेले जबाब मी वाचले नव्हते. अपहाराचा कालावधी दि.१.१२.२०१९ ते २३.३.२०२० पर्यंतचा आहे. दि.२३.३.२०२० पावेतो माझी पारनेर पो.स्टे.ला नेमणुक होती. अपहार १५ लाख २२ हजार रुपयांचा होता.

प्रश्न– अपहार किती खातेदारांच्या रकमेबाबत झाला होता?

उत्तर– मला जे बँकेने कागदपत्र दिले त्या अनुषंगाने ३ खातेदारांच्या रकमेबाबत अपहार झाला होता.

हे म्हणणे खरे आहे की चार्जशिट दाखल करण्यापुर्वी तपासी अधिकारी काळे यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडीयाकडुन पत्राद्वारे काही माहीती मागवली होती. ते पत्र मी पाहीले नव्हते. त्या पत्राच्या अनुषंगाने बँकेने माझ्याकडे फोर्जड् कागदपत्रे दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की तपासी अधिकारी काळे यांनी मागवलेली संपुर्ण माहीती मिळाली की नाही याबाबत मला माहीती नाही. काळे यांनी केलेल्या पत्रव्यवहारानंतर बँकेकडुन मुदतीत माहीती मिळाली नसल्याबाबत मी बँकेकडे कारण विचारले नाही. फिर्यादी नागेंद्रकुमार पांडा व रुद्रदत्त यांना मी माझ्याकडे तपास आल्यावर चौकशीसाठी बोलावले नव्हते.

प्रश्न– घनशाम औटी यांच्या नि.७१ वरील उलटतपासामध्ये त्याने असे सांगितले आहे की तुम्ही त्यांची ओळख शाखाधिकारी यांच्याशी करुन दिली होती?

उत्तर– जप्ती पंचनाम्यावेळी मी घनशाम औटीची ओळख शाखाधिकारी यांच्याशी करुन दिली होती.

हे म्हणणे खरे नाही की मी घनशाम औटीची ओळख करुन देताना बँकेमध्ये त्यास कामास घेण्याकरीता सांगितले होते. मी सांगतो की घनशाम औटी सेंट्रल बँक ऑफ इंडीयाचा कर्मचारी होता. कोणत्या शाखेचा होता हे माहीत नाही. हे मला सांगता येणार नाही की दि.१८.११.२०२२ रोजी जा.क्र.१००/२०२२ अन्वये तपासी अधिकारी राजेश काळे यांनी बँकेकडुन ४ कागदपत्रे ज्यामध्ये ३ ठेवपावत्या व १ विथड्रॉवल स्लीप आहे त्याबाबत माहीती मागवली होती. ज्यांच्या ठेवीच्या पावत्या होत्या व विथड्रॉवल स्लीप होती त्या खातेदारांना मी पंचनाम्यावेळी बोलावले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की राजेश काळे यांनी मागितलेली सर्व

कागदपत्रे दाखल झाली की नाही याची चौकशी न करता जी कागदपत्रे माझ्याकडे दाखल केली त्याचा जप्ती पंचनामा मी केला. हे म्हणणे खरे नाही की ज्या खातेदारांचे ते पावत्या व विथड्रॉवल स्लीप होती त्या खातेदारांना पंचनाम्यावेळी मी बोलावले नसल्याने त्या पावत्या व स्लीप ख–या आहेत की खोटया याबाबत मला सांगता येणार नाही.

प्रश्न– केवळ बँकेने सदर कागदपत्रे दाखल केली या समजुतीवरुन तुम्ही कोणतीही चौकशी न करता ती कागदपत्रे खरी असल्याचे तुम्ही सांगत आहात?

उत्तर– बँकेने माझ्यासमोर जी कागदपत्र दाखल केली ती खरी आहेत.

हे मला माहीत नाही की दि.१८.११.२०२२ रोजी झालेल्या पंचनाम्यांमधील पंच नामे घनशाम औटी व अजित कावरे हे बँकेशी संबंधीत आहेत किंवा कसे.

प्रश्न– घनशाम औटी हा सेंट्रल बँक ऑफ इंडीयाशी संबंधीत असल्याबाबत तुम्हाला कसे कळाले?

उत्तर– घनशाम औटीनेच मला सांगितले होते.

घनशाम व अजित यांना मी पंचनाम्यासाठी तोंडी बोलावले होते. मी सांगतो की मला ज्या व्यक्ती बाहेर मिळाले त्यांना मी पंच म्हणुन बोलावले. आता मला नि.७२ वरील पंचनाम्यामधील तुकाराम तिकोणे यांचा व नि.७३ वरील पंचनाम्यामधील सुखदेव पवार यांचे नमुद केलेले खाते क्रमांक दाखवण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की ते दोन्ही खाते क्रमांक सारखे आहेत.

प्रश्न– सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शाखा वडझीरे यामधील तुकाराम तिकोणे व सुखदेव पवार हे दोन्ही खातेदार असुन त्यांचे खाते क्रमांक सारखे राहु शकतात का?

उत्तर– खाते क्रमांक सारखे असु शकत नाहीत. ती पावती आरोपीने खोटी बनवली आहे.

प्रश्न– ती पावती आरोपीने खोटी बनवली की नाही याबाबत तुम्ही ती पावती हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवली होती

उत्तर– होय. कागदपत्रांवरुन आम्ही केलेल्या प्राथमिक चौकशीवरुन ती पावती खोटी आहे असे वाटले व त्याची खात्रीकरण्याकरीता ती पावती आम्ही हस्ताक्षर

तज्ञाकडे पावठली.

सदरील पावती खोटी असल्याचे जाणवल्यावर मी तुकाराम तिकोणे व सुखदेव पवार यांना चौकशीसाठी बोलावले नाही.

प्रश्न– सारखे खाते क्रमांक नमुद असल्याबाबत तुम्ही त्याबाबत बँकेकडे चौकशी केली होती का?

उत्तर– त्याबाबत मी लेखी पत्र दिले नव्हते मात्र शाखा व्यवस्थापक यांनी त्यासंदर्भात सविस्तर समजावुन सांगितले होते की खोटी पावती तयार केलेली दिसते.

हे म्हणणे खरे आहे की सदरील दोन खातेदारांकडुन मी चौकशी न करता केवळ बँकेने ती पावती खोटी असल्याचे सांगितल्यावरुन मी ती पावती हस्ताक्षर तज्ञाकडे तपासकामी पाठवली. हे म्हणणे खरे नाही की दि.१८.११.२०२२ रोजी झालेल्या २ पंचनाम्यांमधील कागदपत्रांबाबत मी खातेदारांकडुन कोणतीही चौकशी न करता केवळ मोघमपणे सदरील कागदपत्रे पुढील तपासासाठी हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवली. हे म्हणणे खरे नाही की दि.१८.११.२०२२ रोजी पंचनाम्यांमधील मी बँकेशी संबंधीत असलेल्या लोकांना पंच घेवुन बँकेला मदत करण्याकरीता खोटे पंचनामे तयार केले.

मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2026.01.06 17:09:57 +0530

(डॉ. एन.एस.सबनीस)

दिनांकः ०५/०१/२०२६. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,

पारनेर.

**<u>मध्यान्हानंतर उलटतपास आरोपीकरीता विधीज्ञ श्री.ए.पी. रोकडे यांच्यामार्फत शपथेवर पुन्हा सुरुः</u>**

हे म्हणणे खरे आहे की दि.२.१२.२०२२ रोजीच्या कागदपत्र सादर पंचनाम्यामध्ये दिपक ढवण व समित बोराडे हे दोन्ही पंच सेंट्रल बँक ऑफ इंडीयाचे कर्मचारी होते. ते दोन्ही पंच मला बाहेर मिळुन आल्याने त्यांना पंच म्हणुन घेतले. ते

दोन्ही पंच बँकेत कोणत्या शाखेत नोकरीस होते याबाबत मी चौकशी केली नाही.

प्रश्न– पंचनाम्यात समित बोराडेचा पत्ता पुण्याचा नमुद असताना ते पंच म्हणुन तुम्हाला बाहेर कसे मिळुन आले?

उत्तर– समित बोराडे मला बाहेर मिळुन आले होते व कदाचित ते फिर्यादीसोबत तेव्हा आले असतील.

हे म्हणणे खरे नाही की आनंद रंगारी यांनी दिपक ढवण व समित बोराडे येण्या अगोदरच माझ्यासमोर कागदपत्रे सादर करुन ठेवले होते. हे म्हणणे खरे नाही की दि.२.१२.२०२२ रोजी जप्त केलेल्या ६ कागदपत्रांबाबत पुर्वीच राजेश काळे यांनी तपास केल्यामुळे मला त्या ६ कागदपत्रांबद्दल माहीती नाही व केवळ मी ते जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की दि.२.१२.२०२२ रोजी जप्त केलेल्या ६ कागदपत्रांबाबत ती कागदपत्रे कोणाची आहेत व ती खरी आहेत की खोटी आहेत याबाबत जुने तपासी अधिकारी काळे यांनी तपास केल्यामुळे त्याची मला माहीती नाही व मी केवळ सदर कागदपत्रे जप्त केली. हे म्हणणे खरे नाही की दि.२.१२.२०२२ रोजी जप्त केलेली ६ कागदपत्रे ही बँकेनेच बनावट तयार करुन माझ्याकडे दिली व त्यासंदर्भात मी बँकेचेच कर्मचारी पंच म्हणुन घेवुन त्यांचा खोटा पंचनामा तयार केला.

प्रश्न– तुम्ही प्रकाश बोरुडे, विद्या उघडे, भुषण संखे यांची प्रत्येकी ६ सहयांचे नमुने असणारे कागदपत्र बँकेकडुन मागितले असता बँकेने त्याबाबत २१ कागदपत्र का दिले व ते तुम्ही का दाखल करुन घेतले?

उत्तर– मला त्यातील कागदपत्रे तपासासाठी उपयुक्त वाटली म्हणुन मी ती कागदपत्रे दाखल करुन घेतले.

हे म्हणणे खरे आहे की दि.१.१२.२०२२ व २.१२.२०२२ रोजी झालेल्या पंचनाम्यांमध्ये दिपक ढवण व समित बोराडे पंच साक्षीदार होते. दि.२.१२.२०२२ रोजीच्या पंचनाम्यासाठी समित बोराडे यांना मी बोलावुन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की दि.१.१२.२०२२ रोजीच्या पंचनाम्यास मी बँकेच्याच कर्मचा–यांना पंच म्हणुन बोलावुन तसा खोटा पंचनामा केला. हे म्हणणे खरे आहे की जेवढे कागदपत्रांचे जप्ती पंचनामे केले ते सेंट्रल बँक ऑफ इंडीयाच्या अधिका–याने सादर केले होते व जप्तीसाठी पंच हे सेंट्रल बँक ऑफ इंडीयाचेच कर्मचारी होते. हे म्हणणे

खरे नाही की सेंट्रल बँक ऑफ इंडीयाचे कर्मचा–यां व्यतिरीक्त मी दुसरे पंच साक्षीदार न घेता मी आरोपीला जाणीवपुर्वक या गुन्हयात गुंतवण्यासाठी हे खोटे पंचनामे केले.

प्रश्न– नि.२२३ वरील पत्रामध्ये बनावट दस्तऐवज शाखा वडझीरेकडुन प्राप्त न झाल्याने असा उल्लेख आहे तर तुम्हाला कोणते कागदपत्र प्राप्त नव्हते झाले?

उत्तर– जे आरोपीने बनावट कागदपत्र केले होते ते बँकेकडुन मला प्राप्त नव्हते झाले.

प्रश्न– काय कारणास्तव तुम्हाला ते कागदपत्र बँकेकडुन प्राप्त झाले नाहीत?

उत्तर– ते बँकेलाच माहीत.

प्रश्न– आनंद रंगारीकडुन रंजना मोरे यांच्या २ ठेवपावत्या तुम्हाला मिळुनही तुम्ही त्यापैकी एकच पावती हस्ताक्षर तज्ञाकडे का पाठवली?

उत्तर– मला रंजना मोरेची एकच पावती आनंद रंगारीकडुन मिळाली होती, दोन पावत्या मिळाल्या नव्हत्या.

सदर गुन्हयाच्या अनुषंगाने झालेल्या स्पेशल ऑडीटचा रिपोर्ट मी पाहीला नाही. तो स्पेशल ऑडीटचा रिपोर्ट मी दाखल केला नव्हता. तो स्पेशल ऑडीटचा रिपोर्ट कोर्टात कोणी दाखल केला याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की जे जप्ती पंचनामे मी केले व जी कागदपत्रे मी हस्ताक्षर तज्ञाकडे पाठवली ती मी आरोपीला गुंतवण्यासाठी पाठवली व बँकेला मदत करण्यासाठी पाठवली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला गुंतवण्यासाठी व बँकेला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS
Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2026.01.06 17:10:06 +0530

(डॉ. एन.एस.सबनीस)

दिनांकः ०५/०१/२०२६.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,

पारनेर.